# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पुणे महानगरपालिकेच्या हडपसर हद्दीतील मांजरी रस्त्याचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत

**(१) ११५८ (२३-१२-२०१४). श्री. योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या हडपसर हद्दीतील मांजरी रस्त्याचे काही महिन्यांपासून सुरु असलेले रुंदीकरण व क्रॉंक्रिटीकरणाचे काम संथगतीने सुरु असल्याने अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या परिसरात रस्ता अरुंद होऊन वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ता रुंदीकरणाच्या कामात जलवाहिनी व विद्युत वाहिनीच्या स्थलांतरामुळे व रुंदीकरणात येणा-या खाजगी मालकीच्या जागेवरील कुंपणाच्या भिंतीमुळे हे काम अनेक महिन्यापासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याचे काम तातडीने होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१५) :** (१) नाही.

सदर भागात उपलब्ध असलेल्या जागेमध्ये रस्त्याचे रुंदीकरण व कॉंक्रिटीकरण करुन दिनांक ३१.७.२०१४ रोजी काम पूर्ण करणेत आले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हडपसर मतदार संघातील कोंढवा खुर्द येथील लुल्लानगर चौक येथे मुख्य रस्त्यावर उड्डाणपुल बांधण्याबाबत

**(२) ११६४ (२३-१२-२०१४). श्री. योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) कोंढवा खुर्द येथील लुल्लानगर चौक येथे मुख्य रस्त्यावर उड्डाणपुल बांधण्याची मागणी नागरिकांकडून गेल्या अनेक वर्षापासून होत असून सदरहू मागणी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी उड्डाणपुल व्हावा म्हणून नागरिकांनी अनेक वेळा आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेने या उड्डाणपुलासाठी प्रस्ताव तयार करुनही अजून पर्यंत हे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यावर काय उपययोजना केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१५) :** (१) होय.

(२) या ठिकाणी उड्डाणपुलाचे काम होणेसाठी लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला आहे.

(३) प्रस्तुत उड्डाणपुलाकरीता सध्या उपलब्ध असलेला रस्ता हा संरक्षण विभागाने सन १९३५ साली अधिग्रहीत केलेला असल्याने, संरक्षण विभागाने सदर उड्डाणपुलाच्या कामास हरकत घेतलेली आहे. त्या अनुषंगाने सदर प्रकल्पाचे काम दिनांक १४/१२/२०११ पासून पूर्णपणे स्थगीत करणेत आलेले आहे.

(४) पुणे महानगरपालिकेतर्फे सदर प्रकल्पाचे कामासाठी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार पात्र मे. अतुर इंडिया प्रा.लि. यांना दिनांक ९/११/२०११ रोजी वर्कऑर्डर देण्यात आलेली आहे. तथापि, संरक्षण खात्याकडून घेण्यात आलेल्या हरकतीच्या अनुषंगाने या प्रकल्पासाठी जागा उपलब्ध होणेकरीता सचिव, संरक्षण विभाग, नवी दिल्ली यांजकडे दिनांक ३०/८/२०१२ व दिनांक १७/५/२०१३ रोजी निवेदन सादर करणेत आलेले आहे. तसेच उपरोक्त कामासाठी दिनांक १८/७/२०१४ रोजी सह सचिव, संरक्षण विभाग (JS) (C& W) नवी दिल्ली येथे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेतर्फे दिनांक २१/७/२०१४ रोजी ना हरकत प्रमाणपत्र (Working Permission) मिळणेबाबतचा पुर्नप्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक १/९/२०१४ रोजी समजुतीचा करारनामा (Memorandum of Understanding) पुणे सब एरिया यांजकडे सादर केलेला आहे.

(५) सदर उड्डाणपुलाचे काम संरक्षण खात्याने अधिग्रहीत केलेल्या रस्त्यावर प्रस्तावित असल्याने, या कामासाठी ना हरकत प्रमाणपत्र (Working Permission) मिळणेबाबतची कार्यवाही संरक्षण खात्याकडे प्रलंबित असून, संरक्षण खात्याकडील परवानगी मिळाल्यानंतर या प्रकल्पाचे काम हाती घेणे शक्य आहे.

---

**राज्यात कुटुंब नियोजनाची बिनटाका (लेप्रोस्कोपी) शस्त्रक्रिया प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुरु करण्याबाबत**

**(३) १५०६ (२२-१२-२०१४). श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने गरज महिलांसाठी कुटुंब नियोजनाची बिनटाका (लेप्रोस्कोपी) शस्त्रक्रिया प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये व्हावी यासाठी आवश्यक इमारत व उपकरणे यांची व्यवस्था केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुभवी डॉक्टर नसल्यामुळे सदर शस्त्रक्रिया कोणत्याही आरोग्य केंद्रामध्ये होत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये खाजगी डॉक्टरांमार्फत या शस्त्रक्रिया केल्या जातात व रुग्णांकडून भरमसाठ रक्कम वसूल केली जाते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ठिकाणी अनुभवी डॉक्टर नेमण्यासाठी शासनाने तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-०१-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्रत्येक जिल्हयात जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा गुणवत्ता अभिवचन समिती कार्यरत आहे. कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या प्रशिक्षित डॉक्टरांच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात.

(३) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या सुचनानूसार कुटूंब नियोजन योजनेंतर्गत शस्त्रक्रिया केलेल्या रुग्णांना मोबदला दिला जातो. त्यामुळे रुग्णांकडून भरमसाठ रक्कम वसुल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) जिल्हा गुणवत्ता अभिवचन समितीकडून वेळोवेळी शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांना मान्यता दिली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अवकाळी पावसामुळे झालेल्या पीक नुकसानीबाबत**

**(४) २१९० (२२-१२-२०१४). श्री. डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः धुळे जिल्हयात पडलेल्या अवकाळी पावसामुळे, बाजरी, भात, नाचणी (साक्री तालुक्यात) आणि फळ पीके उदा. डाळिंब, टमाटा इ. चे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले

आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर नुकसान ग्रस्त शेतक-यांना शासनाने नुकसान भरपाई देण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यात माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१४ या कालावधीत अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या नुकसानीच्या क्षेत्रास विशेष दराने मदत देण्यासंदर्भात महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१५/प्र.क्र.२/म-३, दि. ४ फेब्रुवारी, २०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. विशेष दर :- शेतीपिके रु.१००००/- प्रति हे., सिंचनाखालील पिके रु.१५०००/- प्रति हे. व फळपिके रु.२५०००/- प्रति हेक्टर.

तसेच महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-०३/२०१५/प्र.क्र.३६/म-११, दि. २६ मार्च,२०१५ अन्वये रक्कम रु.८६.०९ कोटी इतका निधी मदत वाटपासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उल्हासनगर शहरामध्ये नागरी दलित वस्ती अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) २४४९ (२३-१२-२०१४). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहरामध्ये नागरी दलित वस्ती अंतर्गत निधी उपलब्ध करणे कामी प्रस्ताव उल्हासनगर महापालिकेने शासनाकडे पाठवला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने हे काम लवकरात लवकर पुर्ण व्हावे या करीता कोणती पावले उचलली आहेत,

(३) असल्यास, यातील विलंबाची कारणे काय अहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१५) :** (१) होय.

(२) नागरी दलित वस्ती सुधारणा योजना ही जिल्हास्तरीय योजना आहे. या योजनेअंतर्गत ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडे सन २०१४-२५ मध्ये रु. ३०, ८३,०३,३००/- इतका निघी सुपूर्द केला आहे. उल्हासनगर महानगरपालिकेने त्यांना हाती घ्यावयाच्या कामासंदर्भात ठाणे जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करुन निधी उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे महानगरपालिका गलिच्छ वस्ती सुधारणांतर्गत देण्यात आलेल्या सदनिकेत मोठ्या प्रमाणात करण्यात आलेली अनधिकृत घुसखोरी

**(६) २५०५ (२३-१२-२०१४). श्री. संग्राम थोपटे (भोर), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका गलिच्छ वस्ती सुधारणांतर्गत वडार समाजातील व्यक्तीचे पुनर्वसन करण्याकरीता देण्यात आलेल्या सदनिकेत मोठ्याप्रमाणात करण्यात आलेली अनधिकृत घुसखोरी तातडीने हटविण्याबात मा.माजी विधानसभा सदस्य यांनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडार समाजावर वारंवार होत असलेला अन्याय दुर करुन त्यांना न्याय मिळण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१५) :** (१) होय.

(२) वडारसमाज बांधवांना सन १६९०-१९६१ साली सदनिका देण्यात आल्या होत्या. सदर सदनिका धारकांनी भाडे थकविल्यामुळे महानगरपालिका स्थायी समितीच्या ठरावानुसार व मा. लघुवाद न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांच्या सदनिका ताब्यात घेण्यात आल्या. सदर सदनिकांचे महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे वेळोवेळीचे ठरावानुसार पुर्नवाटप करण्यात आले. सदर सदनिका पुन्हा वडार समाजबांधवांना परत मिळण्याच्या मागणीच्या अनुषंगाने महानगरपालिकेतर्फे सन ऑक्टोंबर-नोव्हेंबर २०१० मध्ये सविस्तर चौकशी करण्यात आली असून, अनधिकृत वास्तव्य करणाऱ्यांबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८०-ब नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे येथील भुयारी मार्ग विनावापर पडून असल्याबाबत

**(७) २५१० (२३-१२-२०१४). श्री. संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील पादचा-यांना ओलांडता यावे म्हणून पालिका प्रशासनाने गेल्या काही वर्षात भुयारी मार्ग बांधले, मात्र हेच भुयारी मार्ग आता वापराअभावी धुळखात पडले असून येथे अनधिकृत पथारी व्यावसायिकांनी विळखा घातला असल्याचे दिनांक ३ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरील भुयारी मार्गाचा योग्य तो वापर करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(४) अद्‌याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१५) :** (१) व (२) पुणे शहरातील दिवसेदिवस वाढलेली वाहतुक व मर्यादित रस्त्यांची रुंदी किंवा रुंदीकरणास असणाऱ्या मर्यादा लक्षात घेता गर्दीच्या रस्त्यावर, सार्वजनिक वाहतुक व्यवस्था स्थानकांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्यावर मार्केट, कार्यालये, शाळा तसेच जास्त वर्दळ असणाऱ्या मार्गावर पादचाऱ्यांना सुरक्षित व विनासायास रस्ते ओलांडण्याकरिता भुयारी मार्ग विकसित करणेत आलेले आहेत. तथापि, भुयारी मार्गाच्या भागातील वाहतूकीस फेरबदल झाल्याने या भुयारी मार्गाचा वापर कमी झाला असल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.

(३) भुयारी मार्गातून ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांची सुरक्षितता वाढविणेच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेने काही भुयारी मार्गात दुकाने/गाळे प्रस्तावित केलेले आहेत. परिणामी सदर भुयारी मार्ग स्वच्छ व सुरक्षित राहणेस मदत होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दलित पँथरचे संस्थापक, समाजसुधारक, कवी पद्मश्री नामदेव ढसाळ यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(८) २७६८ (१५-०१-२०१५). श्री. सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दलित पँथरचे संस्थापक, समाजसुधारक, कवी पद्मश्री नामदेव ढसाळ यांचे स्मारक खेड तालुक्यातील (जि.पुणे) पूर या त्यांच्या जन्मगावी उभारण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार सदर स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१५) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) ग्रामीण भागात स्मारके उभारण्याकरिता/दुरुस्तीकरीता या विभागाकडे कोणतेही लेखाशिर्ष उपलब्ध नाही किंवा त्याकरिता निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. या विभागाकडे ग्रामीण क्षेत्रात स्मारके उभारण्यास परवानी देण्यासाठी/दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याकरिता लोकप्रतिनिधी/विविध संस्था यांच्याकडून विविध प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यानुषंगाने राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती यांची स्मारके उभारण्याबाबत आवश्यक मार्गदर्शक तत्वे विहित करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येत आहे. तसेच प्राप्त प्रस्ताव विचारात घेता या करिता शासनास मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करावी लागेल. स्मारकांची देखभाल दुरुस्ती, मांगल्य व पावित्र्य राखणे, स्मारक उभारल्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, स्थानिक वाद किंवा जातीय तणाव वाढणार

नाही यांची दक्षता घेणे आवश्यक आहे. स्मारके उभारणे/दुरुस्ती करणे या संदर्भात या विभागास प्राप्त विविध प्रस्तावाच्या अनुषंगने धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता मंत्री मंडळासमोर जाण्याचे प्रस्तावित आहे.

या अनुषंगने निर्णय होण्यास काही कालावधी लागेल त्यामुळे स्मारके उभारणे/दुरुस्ती करणे याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आल्यानंतर स्मारकांच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करता येईल.

---

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील कत्तलखान्याबाबत**

**(९) ३३७८ (२३-१२-२०१४). श्री. लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील कत्तलखान्यास परवानगी दिल्याने येथील लोकांनी रस्ता व रेल रोको केला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दीपावलीच्या मुहूर्तावर गायी सारख्या जनावरांची कत्तल करण्याची परवानगी हरित लवादाने दिली होती काय, असल्यास कैंव्हा दिली होती,

(३) नसल्यास, हरित लवादाच्या मान्यतेशिवाय कत्तलखाने चालू केले असल्यास संबधितांवर कोणती कार्यवाही केली, नसल्यास विलंबाची सर्व साधारण कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हरित लवादाने परवानगी दिली नव्हती.

(३) हरित लवादाने महापालिकेचा पिंपरी पुलाखालील कत्तलखाना बंद केला असून दिनांक १८ ऑक्टोंबर, २०१३ नंतर कायमस्वरुपी बंद स्थितीत आहे.

बकरी ईद निमित्त धार्मिक कारणास्तव कुरेशी संघटनेव्दारे कुर्बानी करिता पर्यायी व्यवस्थापन करावे अशी मागणी केल्यामुळे महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे पुर्वपरवानगीने पिंपरी सर्व्हे नं. २०२, एच.ए. कंपनी शेजारी ३ दिवसांकरिता अशी व्यवस्था करण्यात आली.

---

**तुमसर - मोहाडी तालुका (जि.भंडारा) अंतर्गत बेठेकर - बोथली, सोरणा, बघेडा, चांदपूर नागठाना, टांगा येथील प्रकल्पाचे खोलीकरण करणेबाबत**

**(१०) ३५४३ (२२-१२-२०१४). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर तालुका (जि. भंडारा) अंतर्गत चांदपूर, बघेडा, सोरणा आणि मोहाडी तालुक्याअंतर्गत नागठाणा, बेठेकर - बोथली येथील तलावात गाळ बसल्याने तलावाचे खोलीकरण करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत विभागाने शासनाकडे प्रस्ताव सादर केले आहे काय,

(३) संबंधीत प्रकल्पाचे गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०५-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

धरण बांधल्यानंतर त्यामध्ये कालमानानुसार गाळ साठणे ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. तथापि उल्लेखिलेल्या प्रकल्पांमध्ये गाळामुळे प्रकल्पांच्या सिंचन क्षमतेवर परिणाम झालेला नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील पीएमपीएमएल परिवहन विभागात ७०६ धारक व १०२३ वाहकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(११) ४८१९ (२३-१२-२०१४). श्री. महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पीएमपीएमएल परिवहन विभागात ७०६ धारक व १०२३ वाहकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर रिक्त पदे पूर्ण क्षमतेने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१५) :** (१) नाही. पीएमपीएमएल मधील कायम पदावरील चालक व वाहकांची पदे रिक्त नसून, सदर संक्ष्या ही बदली पदावर जाहिरातीच्या माध्यमातून नियुक्त करावयाच्या चालक व वाहकांची आहे.

(२) परिवहन महामंडळाच्या ताफ्यामध्ये नव्याने दाखल होणाऱ्या बसेस संचलनासाठी या वाहक व चालक बदली सेवकांची संख्या कमी पडणार असल्याने, जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. तथापि, नवीन बसेसची उपलब्धता होण्यास कालावधी लागणार असल्याने, संचालक मंडळाने दिनांक २३/७/२०१४ रोजीच्या बैठकीमध्ये भरती प्रक्रिया स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे.

(३) व (४) जेएनएनआरयुएम अंतर्गत नव्याने आजरोजी बस खरेदी प्रक्रिया खरेदी आदेश निर्गमित करुन सुरु करण्यात आलेली आहे. यास्तव वाहक व चालक बदली सेवकांची ताफ्यात दाखल होणाऱ्या बसेससाठी आवश्यकता भासणार असल्याने येत्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये मान्यता घेऊन चालक व वाहक सेवकांची निवड प्रक्रिया सुरु करण्याचे नियोजन आहे.

---

**राज्य सरकारच्या विविध विभागात काम करणा-या सुमारे २० लाख कर्मचा-यांना माहे जुलै, २०१४ मध्ये जाहिर झालेला महागाई भत्ता अद्याप दिलेला नसल्याबाबत**

**(१२) ७०६३ (०८-०४-२०१५). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारच्या विविध विभागात काम करण्याच्या सुमारे २० लाख कर्मचा-यांना माहे जुलै, २०१४ मध्ये जाहिर झालेला महागाई भत्ता आद्यापर्यंत दिलेला नसल्याप्रकरणी कर्मचारी संघटनानी जानेवारी, २०१५ च्या तिस-या आठवड्यामध्ये मा.वित्त मंत्री यांचेकडे मागणी केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) तसेच राज्यातील सरकारी कर्मचा-यांना देय महागाई भत्ता लवकरात लवकर देण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(४) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५ च्या शासन निर्णयान्वये रज्य शासकीय कर्मचा-यांच्या महागाई भत्त्याचा दर दिनांक १ जुलै, २०१४ पासून १०० % वरुन १०७% करण्यात आलेला आहे. सदर ७% वाढ दिनांक १ फेब्रुवारी, २०१५ पासून रोखीने देण्यात आली असून दिनांक १ जुलै, २०१४ ते ३१ जानेवारी, २०१५ पर्यंतच्या थकबाकीच्या रकमेबाबत स्वतंत्रपणे आदेश काढण्यात येणार आहेत.

(४) या प्रकरणी विलंब झालेला नाही.

---

**मुंबईतील आरे दुग्धशाळेच्या वरळी, कुर्ला व गोरेगाव या तीन डेअऱ्यांची अवस्था अतिशय दयनीय असल्याबाबत**

**(१३) ७०७६ (०४-०४-२०१५). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे दुग्धशाळेच्या वरळी, कुर्ला व गोरेगाव या तीन डेअऱ्यांची अवस्था अतिशय दयनीय स्थितीत असल्याप्रकरणी कामगार संघटनानी मा.दुग्धविकास मंत्री यांची दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी भेट घेऊन मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी कामगारांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, व सदर मागण्यांवर कोणता निर्णय घेण्यात आला आहे व त्यानुसार आतापर्यत कोणती कारवाई केली

वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच आरे दुग्धशाळांच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०५-२०१५) :** (१) कामगार संघटनेने त्यांच्या विविध मागण्यांबाबत मा.मंत्री (दुग्धविकास) यांची भेट घेतली हे खरे आहे. तथापि, सद्य:स्थितीत वरळी दुग्धशाळेतून वरळी व मातृदुग्धशाळा, कुर्ला यांच्या कार्यक्षेत्रामध्ये दैनंदिन ३९ हजार लिटर दुधाचे वितरण केले जात असून, आरे दुग्धशाळेतून दैनंदिन १४ हजार लिटर दूध वितरीत केले जात आहे. तसेच बृहन्मुंबई दूध योजनेमध्ये वरळी येथे एनर्जी, लस्सी व मसाला दूध, मातृदुग्धशाळा कुर्ला येथे तुपाचे उत्पादन, पॅकींग व विक्री केली जाते. त्यामुळे दुग्धशाळेची अवस्था अतिशय दयनीय स्थितीत आहे, हे खरे नाही.
(२) शितल आर्चची मुदतवाढ रद्द करणे, एनर्जीसाठी अनेक वर्षे संगमनेर येथून येणारे दूध अचानक अयोग्य ठरणे, कुर्ला डेअरीतील क्रीम सेपरेटर मशीन ना-दुरुस्त असल्याने कामगार बसून असणे, पॅकींगचा कागद नसणे, अतिरिक्त कर्मचाऱ्यांना पूर्ववत कामावर घेणे व इतर तत्सम कर्मचाऱ्यांशी/कामगारांशी संबंधित मागण्या करण्यात आलेल्या आहेत. शासनास रॉयल्टीद्वारे प्राप्त होणाऱ्या महसूली उत्पन्नाचे नुकसान होऊ नये म्हणून शितल आर्च ला दि.३१/०५/२०१५ पर्यंत तात्पुरती मुदतवाढ देण्यात आलेली आहे. संगमनेर संघाकडून माहे-नोव्हेंबर, डिसेंबर-२०१४ या कालावधीत पुरवठा करण्यात आलेल्या दुधाचे टँकर अल्कोहोल परीक्षा होकारार्थी असल्यामुळे उत्पादनाकरीता वापरण्यात आलेले नाही. औरंगाबाद जिल्हा संघाकडून अल्कोहोल नकारार्थी दुधाचा पुरवठा होत असल्यामुळे सदर दूध एनर्जी उत्पादनासाठी वापरण्यात येत आहे. मातृदुग्धशाळा कुर्ला येथील क्रिम सेपरेटरच्या दुरुस्तीबाबत तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या. तथापि, त्यास प्रतिसाद मिळालेला नाही. तथापि, कुर्ला दुग्धशाळेच्या डेअरीतील कर्मचाऱ्यांकडून वरळी दुग्धशाळेतील काम तसेच अन्य उपविभागांचे काम करुन घेत असल्यामुळे सदर कर्मचारी बसून आहेत, यात तथ्य नाही. या दुग्धशाळेसाठी तूप पॅकींगसाठी पुरवठादाराकडून पॉलीफील्म उपलब्ध करुन घेण्यात आलेली आहे. शासनाने मंजूर केलेल्या सुधारीत आकृतीबंधानुसार अतिरिक्त ठरविलेल्या कर्मचाऱ्यांना समवेतन श्रेणीमध्ये विभागांतर्गत सामावून घेण्याची कार्यवाही सुरु असून, अन्य अतिरिक्त कर्मचाऱ्यांना अतिरिक्त संवर्ग कक्षामार्फत सामावून घेण्यात येईल. कर्मचाऱ्यांच्या अन्य मागण्यांबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयात व्ही.टी.एस. (व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टिम)ची यंत्रणा सुरु नसल्याबाबत

**(१४) ७०९५ (०७-०४-२०१५). श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा धान्याचा टेम्पो आणि रॉकेलचा टँकर तालुक्यातून निघाला की आजच गावात पोहोचेल असा ग्रामस्थांना जाणारा संदेश आणि टँकरवर बसविण्यात आलेली व्ही.टी.एस. (व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टिम) ची यंत्रणा नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :** (१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याचा टेम्पो गोदामातून निघाल्यानंतर शासनाच्या संकेतस्थळावर एसएमएस प्रणालीद्वारे संबंधित गावातील दक्षता समितीच्या सदस्यांना, तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, सरपंच व इतर प्रतिष्ठित व्यक्तींना गोदाम व्यवस्थापक/गोदामपाल यांचेकडून SMS पाठविला जातो.

सद्यस्थितीत कोल्हापूर जिल्हयात केरोसिन घाऊक वितरकांच्या टँकरवर बसविलेली जी.पी.एस. यंत्रणा कार्यान्वित नाही.

(२) व (३) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना वितरित करण्यात येणाऱ्या केरोसिनची वाहतूक करणाऱ्या टँकर्सवर जी.पी.एस.यंत्रणा बसविण्याच्या सूचना शासन परिपत्रक दिनांक २८ मे, २०१० अन्वये देण्यात आलेल्या होत्या.

सदर यंत्रणा घाऊक केरोसिन परवानाधारकांनी सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांच्यामार्फत स्वखर्चाने बसविली होती. तथापि, सदर यंत्रणा पुढे सुरळीत सुरु राहण्याबाबत सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांनी खबरदारी न घेतल्यामुळे, तसेच प्रस्तुत यंत्रणा राबविण्याकरिता घाऊक केरोसिन परवानाधारकांनी आवश्यक ती रक्कम सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांना अदा न केल्यामुळे राज्यातील सर्व जिल्हयातील केरोसनि टँकर्सवरील जी.पी.एस. यंत्रणा सद्य:स्थितीत कार्यान्वित नाही.

केरोसिनची वाहतूक करणाऱ्या टँकर्सवर जी.पी.एस. यंत्रणा बसविण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या विभागणीबाबत केंद्र शासनाकडून दिनांक १६ जुलै, २०११ च्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. तथापि, अद्यापपर्यन्त केंद्र शासनाकडून कोणतेही अभिप्राय प्राप्त झालेले नाही.

---

**राज्यात गॅस ग्राहकांच्या बँक खात्यात थेट अनुदान जमा करण्याच्या योजनेबाबत**

**(१५) ७१०६ (०७-०४-२०१५). श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. राज पुरोहित (कुलाबा), श्री. समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री. गणपतराव देशमुख (सांगोले), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ. राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ जानेवारी, २०१५ पासून गॅस ग्राहकांच्या बँक खात्यात थेट अनुदान जमा करण्यात येत असून गॅस ग्राहकांनी आधार कार्डबाबत महिती देऊनही ती लिंक झाली नसल्याने अमरावती जिल्हयातील ४,०५,१७७ गॅस धारकांपैकी १,२९,०८२ तसेच कोल्हापूर येथील गॅस ग्राहकांच्या खात्यावर अनुदान जमा झालेले नाही व पुणे जिल्हयातील ६४ टक्के नागरिकांनी बँक खाते आणि एलपीजी क्रमांक जोडला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच पनवेल (जि.रायगड) येथील १ लाख ३२ हजार ग्राहकांची बँकेचे खाते आणि गॅस कार्डची जोडणी पूर्ण झालेली नाही त्यामुळे ग्राहकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यात माहे डिसेंबर, २०१४ पासून गॅस सिलेंडरची सबसीडी व रॉकेलसाठी ग्राहकांकडून आधार कार्डची सक्ती केली आहे मात्र महसूल विभागाकडून आधार कार्ड नोंदणीची सुविधाच बंद आहे व अनुदान बँक खात्यात जमा न झाल्यामुळे नागरिकांनी तसेच ग्राहक संघटनांनी तीव्र आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गॅस ग्राहकांच्या बँक खात्यात तातडीने अनुदानाची रक्कम जमा होणेसंदर्भात व आधार कार्ड नसलेल्या नागरिकांना सबसीडी व रॉकेलचा लाभ देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही

ज्या गॅस ग्राहकांनी त्यांच्या बँक खात्याची अचूक माहिती गॅस वितरकाकडे जमा केली आहे अशा गॅस ग्राहकाच्या खात्यात थेट अनुदान जमा केले जात आहे. महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात आलेल्या थेट अनुदान जमा योजनेंतर्गत अमरावती जिल्हयात एकूण ९१.५१% कोल्हापुर जिल्हयात एकूण ८२.१०% आणि पुणे जिल्हयात एकूण ८५.५९% एवढया गॅसधारकांच्या बँक खात्याशी संलग्न असलेल्यांच्या खाती त्यांना देय असलेले थेट अनुदान जमा करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

पनवेल जिल्हयात हिंदुस्थान पेट्रोलियमचे ८७% भारत पेट्रोलियमचे ८५ % आणि इंडियन ऑईलचे ८५% ग्राहकांची बँक खाते व गॅस कार्डाची जोडणी पूर्ण झालेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही. ग्राहकांना आधार कार्डाशिवाय सबसीडी व रॉकेलचा लाभ देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथे विमानसेवा सुरु करण्याबाबत**

**(१६) ७१४५ (०८-०४-२०१५). श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर विमानसेवेकरिता पर्यावरण आणि सुरक्षा आदि स्वरुपातील आवश्यक असलेली "ना हरकत प्रमाणपत्र" मिळून दोन महिने होऊनही विमानसेवेचा प्रारंभ झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर विमानसेवा तातडीने सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१५) :** (१), (२) व (३) कोल्हापूर येथील विमानतळ भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या मालकीचा असून हा विमानतळ बोईंग, एअरबस इत्यादी विमानांच्या वाहतुकीसाठी उपयुक्त नाही. त्यामुळे या विमानतळाच्या विस्तारीकरणाचा निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात आला असून त्याकरिता २२३.१६ हे इतकी जमिन भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास हस्तांतरीत केली आहे. विमानतळ विस्तारीकरणाची कार्यवाही भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाव्दारे करण्यात येत आहे. सध्या हा विमानतळ हवाई वाहतुकीसाठी खुला असून अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासाकरिता विमानतळ उपलब्ध आहे. त्याव्दारे कोल्हापूर विमानतळावर हवाईसेवा सुरु करण्याकरिता विविध विमानसेवा कंपन्यासोबत चर्चा सुरु आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयातील धामणी, नागनवाडी व सर्कनाला या प्रकल्पांचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(१७) ७२२५ (०७-०४-२०१५). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील धामणी, नागनवाडी व सर्कनाला या प्रकल्पांचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाचे काम ७५ टक्के पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय, तसेच पुनर्वसनाचे काम उर्वरित निधी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित कामासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच विलंब करणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल काय ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

धामणी, नागनवाडी व सर्फनाला या प्रकल्पांची कामे भूसंपादन व पुनर्वसनाच्या अडचणीमुळे प्रलंबित आहेत.

(२) नाही.

(३) सदर प्रकल्पांचे भूसंपादन व पुनर्वसन झाल्यानंतर राज्याच्या आर्थोपायाची स्थिती व मा. राज्यपाल महोदायांच्या निदेशानुसार निधी उपलब्ध करुन प्रकल्पाची उर्वरित कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुळगांव बदलापूर (ता. अंबरनाथ, जि. ठाणे) येथील महिला व बालविकास प्रकल्प अधिकाऱ्याच्या दहशतीबाबत**

**(१८) ७२४१ (०७-०४-२०१५). श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगांव बदलापूर (ता. अंबरनाथ, जि. ठाणे) येथील महिला व बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची (सीडीपीओ) सरस्वती बागुल यांनी विभागातील कर्मचा-यांमध्ये दहशत पसरवली असून त्यांना लाच घेताना सन २०११ मध्ये भिवंडी येथे रंगेहाथ पकडले असताना सुध्दा पुन्हा ठाणे जिल्हयातच नियुक्ती देण्यात आल्याने याप्रकरणी विभागातील कर्मचा-यांनी महिला व बालविकास आयुक्तांकडे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधीत दोषीवर कोणती कठोर कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) होय, महिला व बाल विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे स्तरावर चौकशी चे आदेश देण्यात आले आहेत.

(३) चौकशी अंती चौकशी अहवालानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, कल्याण व मुरबाड या तालुकयातील पंचायत समितीमध्ये ग्रामपंचायतीमधील संगणक परिचालक (डाटा ऑपरेटर) हे अल्पशिक्षीत असल्याबाबत**

**(१९) ७३०८ (०८-०४-२०१५). श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, कल्याण व मुरबाड या तालुकयातील पंचायत समितीमध्ये ग्रामपंचायतीमधील संगणक परिचालक (डाटा ऑपरेटर) हे अल्प शिक्षीत असून त्यांचा संगणकांचा कोणताही कोर्स (प्रशिक्षण) झाले नसतानाही त्यांची संगणक परिचालक म्हणून नियुक्ती दिल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्यादरम्यान कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअती काय निदर्शनास आले, तद्नुसार अल्पशिक्षीत व संगणक कोर्स पुर्ण न करणाऱ्या आपल्या मर्जीतील संगणक परिचालकांची नियुक्ती करणाऱ्या पंचायत समितीच्या संबधित अधिकारी ग्रामसेवक व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लोकप्रतिनिधीवर कोणती कडक कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, दिरंगाईची कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) ई-पंचायत प्रकल्पाअंतर्गत विहीत तांत्रिक अर्हतेचे संगणक परिचालक देण्याची जबाबदारी महाऑनलाईन कंपनीची असल्याने संगणक परिचालकांची नियुक्ती महाऑनलाईनकडून करण्यात येते. पंचायत समिती अधिकारी, ग्रामसेवक अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लोकप्रतिनिधीकडून नियुक्ती करण्यत येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिध्दगड (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील हुतात्मा विरभाई कोतवाल यांच्या स्मारकाची दुर्दशा झाल्याबाबत**

**(२०) ७३१३ (०८-०४-२०१५). श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील सिध्दगड येथील हुतात्मा विर भाई कोतवाल यांच्या स्माराकरची दुर्दशा झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्यासुमारास कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर स्मारकाच्या दुरुस्तीसाठी व परिसर सुशोभिकरणासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, दिरंगाईची कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सदर स्मारक संरक्षित वन क्षेत्रात येत असल्याने जिल्हा परिषदेस कार्यवाही करता येत नाही.
(४) सदर स्मारक संरक्षित वन क्षेत्रात येत असल्याने सदर स्मारकाच्या दुरुस्ती व परिसर सुशोभिकरणाबाबतची कार्यवाही वन विभागामार्फत होणे आवश्यक आहे.

---

**राज्यात अनुदानीत अन्न धान्याचे वाटप अपात्र लाभार्थ्यांना करण्यात आल्याबाबत**

**(२१) ७३७५ (०७-०४-२०१५). श्री. अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २००८-२०१३ ह्या ५ वर्षाच्या काळात सुमारे २१०२.७१ कोटी किंमतीच्या सुमारे ४२.२३ लक्ष मे.टन अनुदानीत अन्न धान्याचे वाटप अपात्र लाभार्थ्यांना करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे उक्त कालावधीत सुमारे २६.६९ लाख पात्र दारिद्र्य कुटुंबे अनुदानित अन्नधान्यांच्या लाभापासून वंचित राहिले आहेत तसेच लाभार्थ्यांना अनुदानित अन्न धान्य वितरित न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने लाभार्थ्यांना अनुदानित अन्न धान्य वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात खाजगी विकासकांनी बांधलेल्या इमारतीमधील सदनिकांच्या खरेदी-विक्री व्यवहारात ग्राहकांची आर्थिक फसवणूक होऊ नये कायदेशीर तरतूदीचा वापर करण्याचा निर्णय**

**(२२) ७३८२ (०७-०४-२०१५). श्री. अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खाजगी विकासकांनी बांधलेल्या इमारतीमधील सदनिकांच्या खरेदी-विक्री व्यवहारात ग्राहकांची आर्थिक फसवणूक होऊ नये व विकासकाच्या मनमानीला चाप लावण्यासाठी कायदेशीर तरतूदीचा वापर करण्याचा निर्णय माहिती वैधमापन विभागाचे नियंत्रण व विशेष पोलीस महानिरिक्षक यांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कायदेशीर तरतुदीचे स्वरुप काय आहे व हया तरतूदी खाजगी खाजगी विकासकांच्या प्रकल्पाबरोबर म्हाडा व सिडकोच्या शासकीय संस्थांना लागू करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, सदर कायदेशीर तरतुदीची अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४)

केंद्र शासनाने अधिनियमित केलेल्या वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९ च्या कलम ११ मधील तरतुदीनुसार अप्रमाणित एककांपेक्षा अन्य एककांचा वापर करणे तसेच कलम ३० मधील तरतुदीनुसार कोणतीही वस्तू करारापेक्षा कमी देणे अपराध ठरतो. त्यामध्ये सदनिकांच्या खरेदी-विक्री व्यवहाराचा अंतर्भाव होतो. उक्त कायदा सर्वांसाठी लागू आहे. या अधिनियमाची अंमलबजावणी वैध मापन शास्त्र विभागामार्फत करण्यात येते.

---

**मुंबईवर अंधाराचे साम्राज्य पसरु नये म्हणून अशा आणीबाणीच्या काळात मुंबईसाठी लोडशेडिंगचा प्रोटोकॉल तयार करण्याबाबत**

**(२३) ७३८७ (०४-०४-२०१५). श्री. अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वीजनिर्मिती प्रकल्पात काही बिघाड झाल्यास किंवा बाहेरुन वीज आणण्यात अडचण आल्यास त्या काळात सर्वच मुंबईवर अंधाराचे साम्राज्य पसरु नये म्हणून अशा आणीबाणीच्या काळात मुंबईसाठी लोडशेडिंगचा प्रोटोकॉल तयार करण्याचे निर्देश राज्य सरकारने नुकतेच डिसेंबर, २०१४ मध्ये वीज वितरण कंपन्याना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वीज वितरण कंपन्यानी प्रोंटोकॉल तयार करण्याबाबत काय कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०५-२०१५) :** (१) होय.

(२) स्टेट ग्रीड कोड विनियम २००६ मधील तरतूदीनुसार मुंबई शहर व उपनगरात कार्यरत सर्व वीज वितरण कंपन्यांनी लोड शेडिंग प्रोटोकॉल तयार केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील ट्रॉम्बे येथील वीज केंद्र कोळशावर सुरु करण्याबाबत**

**(२४) ७४६२ (०४-०४-२०१५). ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वीजमागणीचा विचार करता ट्रॉम्बे येथील वीज केंद्र तेलासारख्या महाग इंधनावर चालणारा ५०० मेगावॅटचा संच क्रमांक सहा हा कोळशावर सुरु करणे आवश्यक असल्याची शिफारस माहे डिसेंबर, २०१४ वा त्यादरम्यान उर्जा विभागाने शासनाला केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहराचे वाढते नागरीकरण लक्षात घेता आपत्कालीन प्रसंगी ही वीज उपलब्ध होण्यासाठी हा प्रकल्प सुरु करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१५) :** (१) नाही.

(२) आपत्कालीन परिस्थितीमध्ये या प्रकल्पाचा संच क्र.६ हा तेल आणि गॅसवर चालु करुन या संचापासून वीज निर्मिती करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**घरगुती हिंसाचार थांबविण्यासाठी पूर्णवेळ संरक्षण अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२५) ७४६९ (०७-०४-२०१५). ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री. दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री. विजय औटी (पारनेर), श्री. सुनिल शिंदे (वरळी), श्री. भिमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायद्यान्वये राज्यातील महिलांसाठी प्रत्येक तालुक्यात पूर्णवेळ संरक्षण अधिकारी नेमण्याची कार्यवाही आठ वर्षीपासून झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ही सर्व पदे रिक्त राहण्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यभरातील रिक्त २१६ पदे भरण्यासाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम अंतर्गत तालुकास्तरावरील विभागांतर्गत कार्यरत बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामिण) यांना तसेच तहसीलदार यांना संरक्षण अधिकारी म्हणून घोषित करुन त्यांचे मार्फत सदरचे कामकाज करण्यात येत होते.

(३) शासन निर्णय क्र. मबावि-२०११/प्र.क्र.१७३/का७(भाग-२) दि. १४/७/२०१४ नुसार कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम-२००५ अंतर्गत शासनाने तालुका स्तरावर संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) गट-क या संवर्गाची एकूण २१६ नवीन पदे (दोन तालुक्यामध्ये एक पद व जेथे मोठा तालुका आहे तेथे एक संरक्षण अधिकारी) याप्रमाणे पदे निर्माण केलेली आहेत व त्यानुसार जाहिरात देऊन सदरची पदे सरळ सेवा भरती प्रक्रिया राबवून सदर पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून निवड यादीतील २१६ पैकी १३६ उमेदवार नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाले असून ही कार्यालये सुरु करण्यात आलेली आहेत.

शासन निर्णय क्र.मबावि-२०११/प्र.क्र.१७३/का७(भाग-२) दि.२९/१/२०१५ नुसार कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम -२००५ अंतर्गत शासनाने प्रत्येक तालुकास्तरावर एक संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) गट-क या नुसार उर्वरीत तालुक्याकरिता १४२ संरक्षण

अधिकारी (कनिष्ठ) गट-क पदे मंजूर केलेली आहेत त्यानुसार सदर नवीन निर्माण करण्यात आलेली पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथील बीपीएल/अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना धान्याचा व रॉकेलचा कोटा वाढवून देण्याच्या मागणीबाबत**

**(२६) ७५५६ (०७-०४-२०१५). श्री. आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) येथे सन २०११ च्या जनगणनेनुसार मालेगाव शहर भागाची लोकसंख्येच्या ४५.३४ टक्क्यांच्या सुत्रानुसार ४८९८८७ या लोकसंख्येपैकी केवळ २२२११५ एवढया नागरिकांनाच या योजनेचा लाभ मिळणार असून या लोकसंख्येत बीपीएल/अंत्योदय शिधापत्रिकेवरील लोकसंख्येचा १०० टक्के समावेश करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या मालेगाव धान्य वितरण क्षेत्रात एकूण १००३८० इतके केशरी शिधापत्रिकाधारक असून महानगरपालिका क्षेत्रात प्रतिव्यक्ती ३ लिटरप्रमाणे एकूण १३७३ के.एल.रॉकेलची आवश्यकता असून दरमहा फक्त ४६८ के.एल.रॉकेल नियतन मंजुर होत असल्याने उपलब्ध साठयानुसार प्रती व्यक्ती ७००मि.ली. रॉकेलचे वाटप करण्यात येते नवीन शिधापत्रिका दिल्यानंतर त्यांचा डाटा एन्ट्री केल्यानंतर शासनाकडून धान्याचा व रॉकेलचा कोटा वाढवून देण्याबाबत दरमहा म.जिल्हापुरवठा अधिकारी यांचेकडे अहवाल पाठविण्यात येतो असे असूनही धान्य व रॉकेलचा कोटा कमी केल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याने सदरहू कोटा वाढवून मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी याबाबत शासनाकडे पाठपुरावा करीत आहे परंतु शासनाने अद्यापही उचित कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :** (१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार शहरी भागाकरिता लोकसंख्येचे ४५.३४ टक्के एवढे प्रमाण विचारात घेता, मालेगाव शहरातील बीपीएल व अंत्योदय योजनेतील सर्व लाभार्थ्याचा समावेश पात्र लाभार्थ्यांमध्ये करण्यासाठी इतर तालुक्यातील ८,३३४ एवढा लाभार्थी इष्टांक मालेगाव शहराकरिता वर्ग करण्यात आला आहे.
(२) व (३) केंद्र शासनाने माहे जानेवारी, २०१५ पासून राज्याच्या केरोसिन नियतनामध्ये कपात केली असून सध्या राज्याच्या मागणीच्या २८ टक्के केरोसिनचे नियतन केंद्र शासनाकडून प्राप्त होत आहे. त्यानुसार उपलब्धतेच्या प्रमाणात सर्व जिल्ह्यांना केरोसिनचे नियतन मंजूर करण्यात येत आहे. केरोसिनच्या नियतनात वाढ करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना नियमितपणे विहित परिमाणानुसार अन्नधान्याचे वाटप करण्यात येत आहे. सदर अधिनियमांतर्गत पात्र नसलेल्या ए.पी.एल. (केशरी) लाभार्थ्यांना राज्य शासनातर्फे आर्थिक भार सोसून सवलतीच्या दराने अन्नधान्य वितरीत करण्याचा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळासमोर विचारार्थ ठेवण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अनाथलयातील बालगृह कर्मचा-यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(२७) ७५६८ (०८-०४-२०१५). श्री. पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री. ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री. संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री. सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनाथलयातील बालगृह कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ झाली नसल्याने शिक्षकांमध्ये असंतोष पसरलेला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकीकडे शासनाने तुरुगांतील कैद्यांच्या दैनिक भत्त्यात वाढ करुन एका कैद्याला दिवसाला ४५ रुपये भत्ता देय केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुरुगांतील कैद्यांना भत्ता दिला जातो पण अनाथ बालकांचा सांभाळ करणा-या बालगृह कर्मचा-यांचे सुरु असलेले वेठबिगारी याकडे दुर्लक्ष का करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर कर्मचा-यांना न्याय मिळवून देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) गृह विभाग शासन निर्णय क्र.जएलई-१०१३/७२६/प्र.क्र.१८५/तुरुंग-१ दि.२० ऑगस्ट, २०१४ अन्वये बंद व खुले कारागृहातील कुशल बंद्यांसाठी सुधारित मेहनताना प्रति दिवस / प्रति टास्क रु. ५५/- व खुल्या वसाहतीतील कुशल बंद्यांसाठी सुधारित मेहनताना (प्रति दिवस / प्रति टास्क) रु. ७०/- इतका अनुज्ञेय आहे.

(३) व (४) स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या बालगृहातील कर्मचाऱ्यांना शासनामार्फत मानधन/वेतन दिले जात नाही. शासनामार्फत स्वयंसेवी संस्थांना दिलेल्या सहाय्यक अनुदानातून कर्मचाऱ्यांचा खर्च भागविला जातो.

---

**पेण (जि.रायगड) तालुक्यातील हजारो एकर भातशेती नापीक होऊन पडीक झाल्याबाबत**

**(२८) ७६२० (०७-०४-२०१५). श्री. धैर्यशील पाटील (पेण), श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील अनेक ठिकाणी अगोदरच फुटलेल्या खारबंदीस्तीच्या बांधातून उधाणाचे खारे पाणी दिनांक २७ डिसेंबर, २०१४ रोजी शेतीत घुसल्याने दादर, भाल, कोप्रोली आदी ठिकाणीची हजारो एकर भातशेतीची जमिन नापिक होऊन पडीक झाली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारबंदीस्तीची कामे करोडो रुपये खर्च करुन देखील व्यवस्थीत होत नसल्याने शेतक-यांवर ही वेळ आल्याचे शेतकरीवर्गाकडून व्यक्त केले जात आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यावर कायमस्वरुपी पर्याय शोधून भातशेती नुकसान होणार नाही याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

माहे जानेवारी व फेब्रवारी २०१५ मध्ये झालेल्या मोठ्या उधानामुळे नारवेल बेनवले खारभूमी योजनेतील भाल या गावाच्या भागाला पडलेलया खांडीची दुरुस्ती उपलब्ध असलेल्या देखभाल व दुरुस्ती निधीतून व स्थानिक लाभार्थ्यांच्या सहकार्याने करुन लाभक्षेत्र नापिक होणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे.

तथापि, दादर, कोप्रोली या खाजगी योजना असल्यामुळे त्यांच्या दुरुस्ती कामे शासनामार्फत केली जात नाहीत.

(२) नाही.

खारभूमी योजनेच्या देखभाल व दुरुस्ती करीता उपलबध निधीतून देखभाल व दुरुस्तीची कामे करुन क्षेत्र नापीक होनार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

(३) नाबार्ड अर्थसहाय्यांतर्गत योजनांची नुतनीकरणाची कामे हाती घेऊन कमकुवत झालेलया योजनांचे मजबुतीकरण तसेच उघाड्यांची नवीन बांधकामे करण्यात येत आहे. तसेच नारवेल बेनवले ही खारभूमी योजना राष्ट्रीय चक्रीवाढ आपत्ती निवारण प्रकल्पांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

---

### ई-निविदा प्रक्रियेमुळे ग्रामपंचायतींना विकास कामे करता येत नसल्याबाबत

**(२९) ७६३२ (०७-०४-२०१५). श्री. धैर्यशील पाटील (पेण), श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यापूर्वी निदान ५ लाखापर्यंतची कामे सक्षम ग्रामपंचायतीना दिली जात होती परंतू शासनाच्या ई-निविदा प्रक्रियेमुळे सक्षम ग्रामपंचायतींना विकास कामे करता येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ई-निविदा प्रक्रियेची मर्यादा वाढवून शासन सक्षम ग्रामपंचायतींना विकास कामे देण्याच्या दृष्टीने शासन निर्णयात बदल करण्याचे धोरण स्वीकारले आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

या विभागाचे दि.२५/३/२०१५ च्या शासन निर्णयान्वये रु.५०,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना रु. १०,००,०००/- व रु. ५०,००१/- च्या पुढे वार्षिक उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना रु.१५,००,०००/- पर्यंतच्या रक्कमेची विकास कामे करता येतात.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील राज्यमार्ग, इतर जिल्हा मार्ग व प्रजिमा व ग्रामीण रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करणेबाबत**

**(३०) ७६३३ (०९-०४-२०१५). श्री. धैर्यशील पाटील (पेण), श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग व ग्रामीण रस्ते जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व वाढत्या औद्योगिकीकरणामुळे अवजड वाहनांची वाहतुक होत असल्याने रस्ते दळणवळणाच्या दृष्टीने नादुरुस्त झाले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत शासनाकडून आवश्यक दुरुस्ती व नुतनीकरण न झाल्याने अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाकडून रायगड जिल्ह्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी विशेष निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :** (१) अंशत: हे खरे आहे.

(२) व (३) अशी बाब दिसून आलेली नाही. रस्त्याच्या दुरुस्तीची व नुतनीकरणाची कामे शासनाच्या विविध योजनांमधून निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रमांनुसार हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे. रस्ते वाहतूकीस सुरळीत ठेवण्यात आले आहेत.

---

**अंबा नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याचे दरवाजे निकामी झाले असल्याबाबत**

**(३१) ७६३५ (०७-०४-२०१५). श्री. धैर्यशील पाटील (पेण), श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. भरतशेठ गोगावले (महाड), श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. राज पुरोहित (कुलाबा), श्री. समीर कुणावार (हिंगणघाट), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा तालुक्यातील अंबा नदीत स्थानिक कोळी बांधव मच्छिमारी व्यवसाय करीत असून वाकण येथे पाटबंधारे विभागामार्फत कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बांधला असून या बंधाराचे दरवाजे निकामी झाले असल्याने नागोठाणे खाडीकडे गोड्या पाण्याचा प्रवाह वाढल्याने मच्छीच्या उत्पादनात घट निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात मच्छिमारी करणा-या ५० पेक्षा अधिक होडीधारकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन खाडीमध्ये येणा-या गोड्या पाण्याचा निचरा तातडीने थांबविण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना करणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेण (जि.रायगड) येथील कराव ग्रामपंचायतीमध्ये आदिवासींसाठी राखीव ठेवलेला निधी इतरत्र खर्च केल्याबाबत**

**(३२) ७६३६ (०७-०४-२०१५). श्री. धैर्यशील पाटील (पेण), श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील ग्रुप ग्रामपंचायत काराव येथे रू.८५ लाख निधी प्राप्त झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रकमेच्या १५ टक्के निधी म्हणजेच रू.१२ लाख ७५ हजार एका वर्षात आदिवासीसाठी खर्च करणे आवश्यक असतांना ग्रामपंचायतीने खर्च केला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दिलेल्या निकषाप्रमाणे खर्च न करता इतर योजनांवर ग्रामसेवकाने मर्जीनुसार खर्च केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी लाभार्थींना या योजनांचा लाभ न झाल्याने योजनांवर झालेल्या परिणामाची भरपाई संबंधित ग्रामसेवकाकडून वसूल करण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, सदर निधीचा गैरवापर करणा-या ग्रामसेवकांवर शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१५) :** (१), (२) व (३) नाही.

शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग दिनांक १८ नोव्हेंबर, १९८९ अन्वये ग्रामपंचायतीच्या एकूण उत्पन्नापैकी कमीत कमी १५ टक्के रक्कम प्रतिवर्षी मागासवर्गीयांच्या उन्न्तीसाठी, त्यांच्या सामुहिक विकासासाठी व त्या वर्गातील व्यक्तींच्या वैयक्तीक लाभ होईल अशा योजनांवर खर्च केली पाहीजे.

ग्रुप ग्रामपंचायत कराराव येथे रु.८५ लाख निधी प्राप्त झाला नसून सदर ग्रामपंचायतीचे सन २०१३-१४ चे एकूण उत्वपन्न रु.९६,०९,९०२/- इतके असून वरील परिपत्रकानुसार उक्त रकमेच्या १५ टक्के म्हणजे रु.१४.४१.५००/- इतकी रक्कम मागासवर्गीयांच्या विकासासाठी खर्च केलेली आहे. त्यामुळे ग्रामसेवकाने मर्जीनुसार खर्च केला अशी वस्तुस्थिती नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरुड तालुक्यातील ( जि.रायगड) अंबोली धरणग्रस्तांना २० टक्के रक्कम अदा करणेबाबत**

**(३३) ७६४१ (०७-०४-२०१५). श्री. धैर्यशील पाटील (पेण), श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड जि.रायगड तालुक्यातील अंबोली धरणाचे काम सहा वर्षापूर्वी पूर्ण झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरण पूर्ण होवून सहा वर्षे झाली तरी शेतक-यांना संपादित केलेल्या जमिनीची २० टक्के रक्कम अद्याप देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी ही बाब जिल्हा प्रशासनाच्या लक्षात आणून माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात शेतक-यांना रक्कम अदा करण्याची मागणी केली हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी जिल्हा प्रशासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :**
(१) होय.
(२) हे खरे नाही. धरणासाठी संपादीत केलेल्या जमीनीचा पूर्ण मोबदला वाटप केला आहे.
(३) व (४) संदर्भत, माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात अंबोली योजनेसंदर्भात भूसंपादन आढावा बैठक दि. १२.१.२०१५ रोजी जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांचे दालनात आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये कालवा भूसंपादन प्रकरणातील २०% रक्कम अदा करण्याबाबत मागणी करण्यात आली.

कालवा भूसंपादनाबाबत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रायगड, अलिबाग या कार्यालयाकडून अंतिम निवाडयाची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

---

**नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील नादुरुस्त असलेल्या**
**शासकीय गोदामातील धान्य खराब होत असल्याबाबत**

**(३४) ७६५५ (०७-०४-२०१५). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेरळ (ता कर्जत, जि.रायगड) येथील शासकीय गोदाम नादुरुस्त असताना सदर गोदामामध्ये शासनाने हमीभाव योजने अंतर्गत भात खरेदी करुन ठेवले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोदामा मधील फर्शी खराब झाल्याने त्यामध्ये उंदीर, घुशी यांनी धान्य ठेवलेली जागा पोकळ करुन सदर धान्य खाऊन टाकल्याने तसेच साठवून ठेवण्यात आलेले भात दिवसेंदिवस खराब होत असल्याने खरेदी केलेल्या धान्यात घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने होणा-या नुकसानीस जबाबदार असणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (१६-०५-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत रायगड जिल्हयामध्ये हंगाम २०१३-१४ मध्ये खरेदी केलेले धान, तहसिलदार कर्जत यांचेकडील सुस्थितीत असलेल्या शासकीय गोदामात साठवणूक केले जात होते. परंतू सदर हंगामातील खरेदी पूर्ण झाल्यानंतर उपरोक्त गोदाम नादुरुस्त झाले. याबाबत तहसिलदार कर्जत यांना अवगत करण्यात आले.

हंगाम २०१३-१४ मध्ये खरेदी झालेल्या धानाची ई-लिलावाद्वारे विक्री करण्याची प्रक्रिया सुरु असून धानाची उचल न झाल्याने साठवणुकीदरम्यान येणारी अट अद्याप निश्चित झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील महसूल विभागामार्फत धान्य साठवण्यासाठी खाजगी गोदामे भाड्याने घेतल्याबाबत**

**(३५) ७६५६ (०७-०४-२०१५). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील महसूल विभागामार्फत धान्य साठवण्यासाठी खाजगी गोदाम २.४० प्रति क्विंटल प्रमाणे आठ महिने मुदतीसाठी भाड्याने खरेदी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आठ महिने मुदतीऐवजी २ महिने मुदत केल्याने खाजगी गोदाम धारकांची फसवणूक झाली आहे तसेच केंद्र शासनाने ठरविलेले निकष व राज्य शासनाने निश्चित केलेल्या भाडे दरात तफावत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी गोदाम धारकांना प्रलंबित भाडे अदा करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, केंद्र शासन व राज्य शासन यामधे तफावत असलेल्या फरकाची रक्कम संबंधित गोदाम धारकांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१६-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मार्केटिंग फेडरेशन, मुंबई या अभिकर्ता संस्थेच्या अधिपत्याखाली जिल्हा मार्केटिंग, रायगड, अलिबाग यांचे कार्यालयामार्फत रायगड जिल्हयात धानाची खरेदी केली जाते. त्यामुळे रायगड जिल्हयात महसूल विभागामार्फत धान खरेदी होत नसल्याने महसूल विभागामार्फत खाजगी गोदामे भाडयाने घेण्यात आलेली नाहीत. तर जिल्हाधिकारी यांनी धान खरेदीसाठी शासकीय गोदामे उपलब्ध करुन दिलेली आहेत.

(२), (३), (४) व (५) हंगाम २००९-१० पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाचे दरानुसार व प्रत्यक्ष धान साठवणुक कालावधीनुसार गोदाम भाडे सबएजंट संस्थांना अदा करण्यात येत होते. सन २०१०-११, २०११-१२ व सन २०१२-१३ मध्ये केंद्र शासनाने मंजूर केलेल्या अनुषंगिक खर्चात प्रति क्विंटल रु. २.०८ प्रमाणे फक्त दोन महिन्यांचे भाडे वित्तीय सल्लागार कार्यालयाकडून मंजूर करण्यात आले होते. हंगाम २०१४-१५ मध्ये रु. २.४० प्रति क्विंटल दर दोन महिन्यांकरिता निश्चित करण्यात आला आहे.

---

**रायगड जिल्हा भाताचे कोठार असून खरिप हंगामात तयार झालेला भात हा भात खरेदी केंद्र सुरु न केल्याने शेतक-यांची व्यापा-यांकडून झालेली फसवणूक**

**(३६) ७६५८ (१०-०४-२०१५). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात खरीप हंगामात तयार झालेल्या भातास भात खरेदी केंद्र सुरु न केल्याने तेथील शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून फसवणूक केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार भात खरेदी केंद्र सुरु करण्याच्यादृष्टीने तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व भात केंद्रे केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे ?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळामार्फत २ धान खरेदी केंद्र सुरु असून त्यावर २२१०.८१ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली आहे.

हंगाम २०१३-१४ मध्ये रायगड जिल्ह्यात खरेदी केलेला धान गोदामात भरडाईविना शिल्लक असल्याने हंगाम २०१४-१५ मध्ये खरेदी होणाऱ्या धानाच्या साठवणूकीकरिता गोदाम उपलब्ध झालेले नाही.

हंगाम २०१३-१४ मध्ये भरडाईविना शिल्लक असलेल्या धानाची ई-निविदाद्वारा विक्री करण्याची कार्यवाही शासनाच्या दिनांक १६.३.२०१५ च्या शासना निर्णयानुसार सुरु आहे.

---

**आर्थिक वर्षाची मुदत ३१ मार्च ऐवजी ३० जून पर्यंत मुदतवाढ देणेबाबत**

**(३७) ७६९० (०७-०४-२०१५). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विवधि योजनातंर्गत कामांना प्रशासकीय मान्यता देणेसाठी बराच कालावधी लागत असल्याने तसेच निविदा प्रक्रिया करणेची विहित कालावधी मर्यादित असल्याने विकास कामे उर्वरित कालावधीत म्हणजे ३१ मार्च आर्थिक वर्ष अखेरपर्यंत पूर्ण होवू शकत नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध कामांसाठी केलेली तरतूद व्यपगत होवू नये म्हणून शासन ३० जून पर्यंत मुदतवाढ देणेबाबत धोरण निश्चित करणार आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०५-२०१५) :** (१) वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ मधील भाग-१, उप विभाग-३ च्या अनुक्रमांक ४ परिच्छेद क्र. २७ (२) मध्ये विहित केल्यानुसार काही योजनांतर्गत कामांना (योजना/प्रकल्प) प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकारी प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यावरील कामांकरीता आवश्यकतेप्रमाणे नियोजन विभाग/वित्त विभागाची सहमती आवश्यक असते.

(२) यासंदर्भात वित्त विभागाकडून जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांच्याकडील अखर्चित निधीबाबत दि.३१.०८.२००७ च्या शासन परिपत्रकान्वये दि.०६.०६.२००८ च्या शासन निर्णयान्वये व दि.२३.०६.२०१४ च्या पत्रान्वये सर्व विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**कृषी अधिक्षक कार्यालय, रायगड अलिबाग येथे**
**नवीन कार्यालय इमारत बांधणेबाबत**

**(३८) ७७०२ (०७-०४-२०१५). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयांचे मुख्यालय अलिबाग येथे कृषी अधिक्षक विभागाचे कार्यालय इमारत नादुरस्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय कार्यालयाची इमारत बांधणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास शासन तातडीने मान्यता देऊन आवश्यक निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. केवळ स्ट्रक्चरल ऑडीट व फायर ऑडीट करण्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, रायगड यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, रायगड यांना कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वांद्रे (पूर्व), मुंबई येथील गांधीनगर म्हाडा वसाहतीमधील इमारत**
**क्र.५१ चे बांधकाम अतिशय धोकादायक असल्याबाबत**

**(३९) ७७२५ (१८-०२-२०१५). श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व), मुंबई येथील गांधीनगर म्हाडा वसाहतीमधील इमारत क्र.५१ चे बांधकाम अतिशय धोकादायक असल्याबाबत माहे जानेवारी, २०१५ अखेर निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२६-०५-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

वांद्रे (पूर्व), मुंबई येथील गांधीनगर म्हाडा वसाहतीतील इमारत क्र. ५१ दृश्यमान पाहणीनुसार मोडकळीस आल्याचे म्हाडाच्या निदर्शनास आले होते.

(२) सदर इमारतीतील पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील एकूण २४ खोल्या म्हाडाच्या मालकीच्या असून सदर खोल्या सन १९८० च्या दरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागास शाळा चालविण्यासाठी भाडेतत्वावर म्हाडाकडून वितरीत करण्यात आले आहेत. सन १९९४ मध्ये सदर इमारतीचे अभिहस्तांतरण करण्यात आले असून सेल डीड वांद्रा निशिगंधा सह. गृह. संस्था, इमारत क्र.५१ या संस्थेबरोबर करण्यात आला आहे. इमारती खालील व इमारतीच्या संलग्न जागेचा भाडेपट्टा करार सदर संस्थेबरोबर करण्यात आला आहे. सदर सेल डीड नुसार म्हाडा सदर इमारतीच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील २४ खोल्यांकरीता सभासद आहेत. इमारत मोडकळीस आल्याचे निदर्शनास आल्यामुळे म्हाडाने उपरोक्त २४ खोल्यांमध्ये असलेली बृहन्मुंबई महानगरपालिकेची शाळा रिकामी करण्याकरीता दि. १४/०३/२०१४ च्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविले असता महानगरपालिकेने सदर शाळा बंद केली आहे व २९ विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था खेरवाडी येथील महानगरपालिकेच्या शालेय इमारतीत करण्यात आली आहे. सदर इमारतीचे संरचनात्मक परिक्षण (Structural Audit) म्हाडाकडून करण्यात आले आहे. सदर इमारतीतील धोकादायक भाग निष्कासित करणे/पाडणे याची जबाबदारी संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेची असल्याने त्यानुसार म्हाडाच्यावतीने सदर संस्थेस कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**वक्फ बोर्डाचे बळकटीकरण करण्याकरिता आकस्मिता निधी तसेच विभागाच्या लेखानुदानाबाबत भरीव आर्थिक निधिची तरतूद करण्याबाबत**

**(४०) ७७७० (०४-०४-२०१५). श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वक्फ बोर्डाचे बळकटीकरण करण्याकरिता आकस्मिता निधी तसेच विभागाच्या लेखानुदानाबाबत भरीव आर्थिक निधिची तरतूद करण्याबाबतची मागणी अल्पसंख्यांक जन प्रतिनिधी तसेच अल्पसंख्यांक विकासासंदर्भात कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांनी विशेषत: अल्पसंख्यांक जनप्रतिनिधी, समाजाच्या सेवाभावी संस्था यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री अल्पसंख्यांक विकास, वित्त व नियोजन मंत्री, राज्यमंत्री अल्पसंख्यांक विकास, प्रधान सचिव अल्पसंख्यांक विकास यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०११ आणि ऑगस्ट, २०१४ वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ च्या अनुषंगाने कोणता भरीव निर्णय देण्यात आला वा येत आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप व व्याप्ती तसेच प्रार्थीत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५) :** (१) होय,

(२) व (३) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्य बळकटीकरणासाठी राज्य शासनाकडून रु. १५ कोटी इतके सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात आलेले असून यापैकी सन २०११-१२ या आर्थिक वर्षात रु. ३.८६ कोटी इतके अनुदान वितरीत देखील करण्यात आलेले आहे तद्नंतर सदर उद्दीष्टाकरिता सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुक्रमे. रु.३ कोटी, रु.२ कोटी आणि रु. १.८० कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली रक्कम अदयाप खर्च न झाल्याने वर नमूद अनुदान वितरित करता आले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वक्फ मंडळाच्या अस्थापणेवर कार्यरत असणा-या कर्मचा-यांना अनुक्रमे ५ व्या व ६ व्या वेतन संरचनेतील फरकाची रक्कम अदा करण्याबाबत**

**(४१) ७७७८ (०८-०४-२०१५). श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वक्फ मंडळाच्या अस्थापणेवर कार्यरत असणा-या कर्मचा-यांना अनुक्रमे ५ व्या व ६ व्या वेतन संरचनेतील फरकाची रक्कम अदा करण्याबाबत तसेच १२+१२ उच्चमत वेतन श्रेणीतील फरकाचे लाभ तसेच वैद्यकीय प्रतिपूर्ती बाबतच्या मागण्यांबाबत तातडीने निर्णय गठीत करण्याची मागणीबाबत संबंधित अल्पसंख्याक जनप्रतिनिधी, तसेच अल्पसंख्याक विकासासंदर्भात कार्य करणा-या सेवाभावी संस्थांनी विशेषतः अल्पसंख्यांक जनप्रतिनिधी, समाजाच्या सेवाभावी संस्था यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री अल्पसंख्यंक विकास, वित्त व नियोजन मंत्री, यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०११ आणि डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ च्या अनुषंगाने कोणता भरीव निर्णय देण्यात आला वा येत आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप व व्याप्ती तसेच प्रार्थीत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०५-२०१५) :** (१) होय,

(२), (३) व (४) वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ७७ (४) (C) मधील तरतूदीनुसार वक्फ मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांचय वेतन व भत्यावरील खर्च वक्फ फंडातून केले जाणे आवश्यक आहे. तसेच कलम ७७ (३) येथील तरतुदींनुसार वक्फ फंडावर राज्य वक्फ मंडळाचे नियंत्रण असते या दोन्ही बाबी राज्य वक्फ मंडळाच्या अखत्यारित असल्याने यासंदर्भात राज्य वक्फ मंडळाकडून निर्णय होणे अपेक्षित आहे. सबब संबंधित निवेदने सुयोग्य निर्णय घेण्यसाठी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात आलेली आहेत. सद्यस्थितीत वक्फ मंडळाचे सर्व उत्पन्न हे कर्मचाऱ्यांचे वेतन व न्यायालयीन प्रकरणांवरील खर्च या दोन प्रमुख बाबींकरिताच खर्ची पडत आहे.

---

**जालना जिल्ह्यात शेती पंपासाठी लागणाऱ्या विद्युत ट्रान्सफॉर्मरचा तुटवडा असल्याबाबत**

**(४२) ७८०७ (०४-०४-२०१५). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात शेती पंपासाठी लागणाऱ्या विद्युत ट्रान्सफॉर्मरचा तुटवडा असल्यामुळे शेतकरी व लोक प्रतिनिधींनी पुरेसा विद्युत ट्रान्सफॉर्मरच्या पुरवठ्याबाबत अनेक आंदोलने केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्युत ट्रान्सफॉर्मरसाठी पैसे भरुन घेतल्याशिवाय ट्रान्सफॉर्मर मिळत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यस, अपुऱ्या विद्युत ट्रान्सफॉर्मरबाबत कोणत्याही अटी न घालता पुरवठा करण्याची मागणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्तप्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०५-२०१५) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साखरखेडा (सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) भारतीय स्टेट बँकेच्या शाखेसाठी रककम नेणाऱ्या व्हॅनवर हल्ला करुन ३० लाख रुपयांची लूट करण्यात आल्याबाबत**

**(४३) ७८१६ (०७-०४-२०१५). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरखेडा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) भारतीय स्टेट बँकेच्या शाखेसाठी रक्कम नेणाऱ्या व्हॅनवर दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास हल्ला करुन ३० लाख रुपयांची लूट करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी स्टेट बँक ऑफ इंडीया, साखरखेडा येथील कॅशियर यांच्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन साखरखेडा येथे गु.र.क्र. १५३/२०१४, भा.दं.वि. कलम ३९५, ३९७, ३५३ सकलम ३/२५, ५/२५, आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी ८ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याजवळून रु. २९,८१,७६०/- गावठी पिस्टल, गुन्हयात वापरलेली वाहने व इतर साहित्या जप्त करण्यात आले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सर्व सिंचन महामंडळामध्ये गेली १८ वर्ष मनमानी नियम करुन भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे सर्रासपणे चालू असल्याबाबत**

**(४४) ७८३३ (०९-०४-२०१५). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व सिंचन महामंडळामध्ये गेली १८ वर्ष मनमानी नियम करुन भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे सर्रासपणे चालू असल्यामुळे याला आळा घालण्यासाठी नियमावली तयार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागसाठी सर्वकष स्वतंत्र नियमावली तयार करण्यासाठी खात्यातील विद्‌यमान आणि माजी अधिका-यांनी एक समिती तयार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने आपला अहवाला शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, सदर अहवाल केव्हापर्यंत प्राप्त होणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :** (१) नाही.

(२) सध्या सार्वजनिक बांधकाम व जलसंपदा या विभागासाठी सार्वजनिक बांधकाम नियमावली लागू आहे. डॉ.माधवराव चितळे, जलतज्ञ यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त सिंचन विषयक विशेष चौकशी समितीने जलसंपदा विभागासाठी स्वतंत्र नियम संहिता असावी, अशी शिफारस केली आहे. सदर शिफारशीच्या अनुषंगाने जलसंवदा विभागातील कामांसाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्यासाठी दि. ०५.१२.२०१४ रोजी खात्यातील विद्‌यमान व माजी अधिकाऱ्यांची समिती गठीत केली आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) दि.०५.१२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीला नियमावली तयार करण्याकरीता ६ महिन्याचा कालावधी विहित करण्यात आला आहे.

---

**जालना तालुक्यातील रामनगर तसेच कारला परिसरात भारनियमन व्यतिरिक्त विजेचा पुरवठा खंडित होत असल्याबाबत**

**(४५) ७८५१ (०४-०४-२०१५). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना तालुक्यातील रामनगर तसेच कारला परिसरात भारनियमन व्यतिरिक्त विजेचा पुरवठा खंडित होत असल्याचे नुकतेच माहे डिसेबर, २०१४ मध्ये उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वीज उपकेंद्र गेल्या कांही महिन्यापासून अभियंत्याविना कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विजेचा पुरवठा खंडित होत असल्यामुळे कृषीपंपधारक शेतक-यामध्ये मोठा असंतोष पसरलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(५) तद् नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०४-२०१५) :** (१) नाही. डिसेंबर, २०१४ मध्ये भारनियमन व्यतिरिक्त अवकाळी पाऊस व वारा वादळ यामुळे वीज पुरवठा काही तास बंद होता.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) भविष्यात येणा-या वाढीव भाराकरिता पायाभुत आराखडा -२ अंतर्गत दोन्हीही उपकेंद्राचा भार कमी करण्यासाठी भाटेवपूरी येथे नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र मंजुर असून काम प्रगती पथावर आहे.

(६) प्रश्न उद्‌भतव नाही.

---

**मुंबई शहरात व उपनगरातील पेट्रोलपंपधारकांकडील नोझेलची पडताळणी वजन व मापे नियंत्रक विभागाकडून झाली नसल्याबाबत**

**(४६) ७८५६ (०७-०४-२०१५). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात व उपनगरात नोझेलद्वारे सीएनजी गॅस भरला जात असून जवळपास १२८ पेट्रोलपंपधारकांकडील नोझेलची वजन व मापे नियंत्रक विभागाकडून पडताळणी तसेच दिल्लीतील संबंधित संस्थेकडून नोझेलच्या मॉडेलची मंजूरी घेतली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पेट्रोलपंपधारकांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

सदर सी.एन.जी. डिस्पेन्सरच्या संदर्भात संबंधितांच्याविरुध्द वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार खटले दाखल करण्यात आले आहेत.

---

**जालना जिल्हयातील रामनगर येथे २२० के.व्ही.वीज केंद्र उभारण्याबाबत**

**(४७) ७८५९ (०४-०४-२०१५). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील रामनगर येथे २२० के.व्ही.वीज केंद्राचा प्रस्ताव मंजूर करणेबाबत स्थानिक लोकप्रितनिधीनी मा.ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनाक २३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(३) अद्यापपर्यंत मंजूरी दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०५-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधीनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. औरंगाबाद परिमंडळ यांना दि.२.२.२०१५ रोजी निवेदन दिले आहे.

(२) डांबरी (रामनगर) ता.जालना, जि.जालना येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याच्या योजनेचा समावेश राज्य पारेषण उपक्रमाच्या २०१४-२०१५ ते २०१८-१९ या पंचवार्षिक योजनेत करण्यात आला आहे. त्यास अनुसरुन मौजे उदवद, ता.जालना येथील उपकेंद्रासाठी सुयोग्य अशा शासकीय जमिनीची निवड करण्यात आली आहे. सद्यस्थितीत उपकेंद्रासाठी महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळाची प्रशासकीय मान्यता घेण्यासाठीची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील अरबी समुद्रात शिवस्मारक उभारण्याकरिता केंद्रीय पर्यावरण खात्याची परवानगी मिळाल्याबाबत**

**(४८) ७८६२ (०७-०४-२०१५). श्री. अर्जुन खोतकर (जालना), श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अरबी समुद्रात शिवस्मारक उभारण्याकरिता केंद्रीय पर्यावरण खात्याची परवानगी मिळाल्याची माहिती मा.मुख्यमंत्री यांनी माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिवस्मारकाचे काम सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व कामाची सद्य स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१५) :** (१) होय.
(२) छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात स्मारक उभारण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नेमणूकीची प्रक्रीया अंतिम टप्प्यात आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गावे हागणदारी मुक्त करण्यात यावी यासाठी शासनाची योजना बंद झाली असल्याबाबत**

**(४९) ७८८२ (०७-०४-२०१५). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गावे हागणदारी मुक्त करण्यात यावी यासाठी शासनाची योजना बंद झाली, हे खरे आहे काय,
(२) तसेच याबाबत प्रत्येक जि.प. व पंचायत समिती स्तरावर आजपर्यंत कोणत्या व किती ठिकाणी कार्यवाही केली आहे काय,
(३) यापुढे ही राबविली जाणारी योजना अंमलात आणली जाणार आहे काय,
(४) याबाबत प्रकल्पाला कालमर्यादा होती काय ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०५-२०१५) :** (१) गावे हागणदारी मुक्त करण्यात यावीत, यासाठी शासन स्वच्छ भारत मिशन, निर्मल ग्राम पुरस्कार योजना आणि संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान यासारख्या ग्रामीण भागातील स्वच्छतेसंबंधीच्या योजना/अभियान राबवित आहे.
(२) उपरोक्त योजना/अभियानाची कार्यवाही राज्यभर प्रत्येक जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत स्तरावर सुरु आहे.
(३) व (४) स्वच्छ भारत मिशन व निर्मल ग्राम पुरस्कार या दोन्ही योजना केंद्र पुरस्कृत असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राबविण्यात येत आहेत. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) ही योजना ऑक्टोबर, २०१९ पर्यंत कार्यरत राहील.

---

**वेंगुर्ले जिल्ह्यातील पाल - गोडवणेवाडी येथील खारलॅण्ड बंधा-यांच्या मोरीला चिखल व फळ्या नसल्याबाबत**

**(५०) ८०१८ (०८-०४-२०१५). श्री. वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेंगुर्ले जिल्ह्यातील पाल - गोडवणेवाडी येथील खारलॅण्ड बंधा-यांच्या मोरीला चिखल व फळ्या नसल्यामुळे दिनांक २५ डिसेंबर, २०१४ रोजी आलेल्या उधाणामुळे खारे पाणी शेतीत घुसुन सुमारे १५ ते २० एकर वायंगणी भात शेती, ६.५ एकर माडबागायतीचे लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी वेळोवेळी संबंधित विभागास लेखी तक्रारी करुनही कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार बंधारे व लिकेज झालेल्या मो-याची डागडुजी त्वरित करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

वेंगुर्ले तालुक्यातील पाल-गोडवणेवाडी येथील आसोलीपाल खारभूमी योजनेच्या उघाडीची झडप दिनांक २५.१२.२०१४ चे उधाणाचे वेळी तुटून शेतात खारे पाणी घुसले होते.

(२) नाही.

(३) नाही.

(४) उघाडीस नव्याने झडप बसवून खारे पाणी शेतात येण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. कायमस्वरुपी उपाय योजना म्हणून संपूर्ण योजनेचे नुतनीकरण करणे प्रस्तावित असून, नुतनीकरणाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.